# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१६ – १७

## **मराठी विभाग**

सकाळ

४



राजगुरुनगर (ता. खेड) : स्त्री जन्माचे स्वागत आणि स्त्रियांचा आदर करण्याची शपथ घेताना विद्यार्थी.

### 'महिलांनी स्वावलंबी व्हावे'

राजगुरुनगर, ता. ९ : "महिला निसर्गतः पुरुषांपेक्षा अधिक सहनशील आणि संवेदनशील असतात. त्यांनी आपल्या या गुणांचा उपयोग करून स्वावलंबी आणि आत्मनिर्भर व्हायला हवे," असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप मुळूक यांनी येथे केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मराठी वाङ्मय मंडळातर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. संजय शिंदे, प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. वर्षा कांबळे, प्रा. गणेश मोढवे आणि प्रथम वर्ष वाणिज्य शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.

मुळूक म्हणाले, "आपल्या जीवनातील यशाचे सर्वोच्च शिखर गाठायचे असेल, तर आत्मविश्वास आणि आत्मनिर्भरतेचे सामर्थ्य मुलींनी ओळखणे गरजेचे आहे. पारंपरिक शिक्षणाबरोबरच आरोग्य, गृहविज्ञान व व्यवहारकुशलता यांचे शिक्षणही घ्यायला हवे."

डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले, प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी आभार मानले.

# विद्यार्थिनींनी स्वसामर्थ्य ओळखावे

## प्रा. दिलीप मुळूक यांचे प्रतिपादन



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थिनी व शिक्षक कर्मचारी शपथ घेताना. (छाया : कोंडीभाऊ पाचारणे)

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात विद्यार्थिनींचा सहभागी होत्या. विद्यार्थिनींना आपल्या जीवनातील उत्कर्षबिंदू गाठायचा असेल तर आत्मविश्वास आणि आत्मनिर्भरतेचे सामर्थ्य त्यांनी ओळखणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप मुळूक यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

प्रा. दिलीप मुळूक यांनी महिलांनी जगातील सर्वच क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे, असे सांगून विद्यार्थिनींनीही स्वतः ला सिद्ध करणे गरजेचे आहे. महिला निसर्गतः पुरुषापेक्षा अधिक सहनशील व संवेदनशील असतात. या गुणांचा उपयोग करून मुलींनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करताना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनायला हवे. पारंपरिक शिक्षणाबरोबरच आरोग्य, गृहविज्ञान व व्यवहारकुशलता यांचे शिक्षणही मुलींनी घ्यायला हवे, असे आवाहन त्यांनी केले. प्रा. प्रतिमा लोणारी यांनी विद्यार्थिनींना शारीरिक व मानसिक क्षमता वाढविण्याचे आवाहन करताना व्यायाम व आहार यांचे महत्त्व सांगितले.

प्रथम वर्ष वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी कु. जुई सांडभोर हिने नुकत्याच अहमदनगर जिल्ह्यातील भंडारदरा धरणाजवळील रतनगडावर केलेल्या ट्रेकिंगचे अनुभव सांगितले.

म्हैसाळमधील बेकायदा गर्भपात करणाऱ्या डॉ. बाबासाहेब खिद्रापुरे याचा व संबंधित पालकांचा तीव्र शब्दात निषेध करण्यात आला. या निमित्ताने उपस्थित विद्यार्थ्यांनी आदिशक्तीच्या रूपातील स्त्रियांना आदर करण्याची, त्यांना समतेची व सन्मानाची वागणूक देण्याची, तसेच स्त्री जन्माचे स्वागत करण्याची शपथ घेतली. या कार्यक्रमा प्रसंगी डॉ. संजय शिंदे, प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा.डी. एन. मारकड, प्रा. सर्दा कांबळे, प्रा. गणेश मोढवे आणि प्रथम वर्ष वाणिज्य शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व शपथेचे वाचन मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ संजय शिंदे यांनी केले तर आभार प्रा.मच्छिंद्र मुळूक यांनी मानले.

संध्या शनिवार, दि. ११ मार्च २०१७ | ६

# 'विद्यार्थिनींनी आत्मनिर्भरतेचे सामर्थ्य ओळखावे': प्रा. मुळूक

राजगुरुनगर : विद्यार्थिनींना आपल्या जीवनातील ध्येय सहजरीत्या गाठायचे असेल तर त्यांनी आत्मविश्वास आणि आत्मनिर्भरतेचे सामर्थ्य ओळखणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप मुळूक यांनी केले.

जागतिक महिला दिना निमित्ताने हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी प्रा. डी. एम. मालवद, प्रा. वर्षा कांबळे, प्रा. गणेश मोढवे उपस्थित होते. मुलींनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करताना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनावे. पारंपरिक शिक्षणाबरोबरच आरोग्य, गृहविज्ञान व व्यवहारकुशलतेचे शिक्षणही मुलींनी घ्यायला हवे असे आवाहन प्रा. मुळूक यांनी केले. प्रा. प्रतिमा लोणारी यांनी विद्यार्थिनींना शारीरिक व मानसिक क्षमता वाढविण्यासह व्यायाम व आहाराचे महत्त्व सांगितले. विद्यार्थिनी जुई सांडभोर हिने ट्रेकिंगचे अनुभव सांगितले. म्हैसाळमधील बेकायदा गर्भपात करणाऱ्या डॉ. बाबासाहेब खिद्रापुरे यांचा व संबंधित पालकांचा या वेळी तीव्र शब्दात निषेध करण्यात आला.

केसरी पुणे, १४ मार्च २०१७ ३

# विद्यार्थिनींनी आत्मविश्वास व आत्मनिर्भरतेचे सामर्थ्य ओळखावे : प्रा. दिलीप मुळूक

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** विद्यार्थिनींना आपल्या जीवनातील उत्कर्षबिंदू सहजरीत्या गाठायचा असेल तर आत्मविश्वास आणि आत्मनिर्भरतेचे सामर्थ्य त्यांनी ओळखणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप मुळूक यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी डॉ. संजय शिंदे, प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. वर्षा कांबळे, प्रा. गणेश मोढवे आणि प्रथम वर्ष वाणिज्य शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. मुळूक यांनी महिलांनी जगातील सर्वच क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे, असे सांगून विद्यार्थिनींनीही स्वतःला सिद्ध करणे गरजेचे आहे. महिला निसर्गतः पुरुषांपेक्षा अधिक सहनशील व संवेदनशील असतात. या गुणांचा उपयोग करून मुलींनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करताना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनायला हवे. पारंपरिक शिक्षणाबरोबरच आरोग्य, गृहविज्ञान व व्यवहारकुशलता यांचे शिक्षणही मुलींनी घ्यायला हवे, असे आवाहन त्यांनी केले. तर प्रा. लोणारी यांनी विद्यार्थिनींना शारीरिक व मानसिक क्षमता वाढविण्याचे आवाहन करताना व्यायाम व आहार यांचे महत्त्व सांगितले.

यावेळी म्हैसाळमधील बेकायदा गर्भपात करणाऱ्या डॉ. बाबासाहेब खिद्रापुरे याचा व संबंधित पालकांचा तीव्र शब्दात निषेध करण्यात आला. या निमित्ताने उपस्थित विद्यार्थ्यांनी आदिशक्तीच्या रूपातील स्त्रीयांचा आदर करण्याची, त्यांना समतेची व सन्मानाची वागणूक देण्याची तसेच स्त्री जन्माचे स्वागत करण्याची शपथ घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व शपथेचे वाचन मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले तर आभार प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख